ISSN : 2348-7143
March -2019

# भटक्या विमुक्तांच्या समस्या व शासकीय उपाययोजना

**प्रा. बी. बी. घुरके**
सहाय्यक प्राध्यापक
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
मो.नं. ९४०५८३८९८२
ई-मेल : ghurakebaburao@gmail.com

**प्रा.पी. एस. चौगुले**
सहयोगी प्राध्यापक
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**सारांश :**

भारतीय समाज चातुवर्ण्याधिष्टीत असून तो अनेक जाती पोटजातींमध्ये विभागलेला आहे. विषमता हे या समाजाचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे. भारतात एक जात, धर्म दुस-या जाती धर्मापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात. त्यामुळे जातीअंतर्गत समानतेची, बंधूभावाची, एकात्मतेची भावना निर्माण झाली नाही. अजूनही येथील माणूस जातीत जन्माला येतो, जातीतच जगतो आणि जातीतच मरतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर भटक्या-विमुक्तांच्या परिस्थितीत सुधारणा होईल अशी अपेक्षा होती परंतु अद्यापर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही. सध्या भारतात एक हजार भटक्या-विमुक्तांची पंधरा कोटींच्या आसपास लोकसंख्या असावी असे २००८ चा रेणके आयोग सांगतो. महाराष्ट्रात एकूण ३७ भटक्या जमाती आणि १४ विमुक्त जाती व २०० च्या वर पोटजातींची संख्या आहे. भटक्या-विमुक्तांसाठी असलेल्या विविध विकास योजना आखण्यात आल्या. परंतु ख-या अर्थाने विकास आजही साध्य झालेला नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात भटक्या जमाती व विमुक्त जातींच्या समस्या आणि उपाययोजना यांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्यानंतर १९५२ ला लोकसभेच्या पहिल्या निवडणूकीदरम्यान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटीश सरकारचा गुन्हेगारी कायदा रदद केला आणि २३ ऑगस्ट १९६० ला हजारो भटक्या-विमुक्तांच्या उपस्थितीत सोलापूर येथील सेटलमेंटचे तीन तारेचे कुंपण तोडून कुंपणातील गुन्हेगार जमातींना मुक्त केले. त्या दिवसापासून या जमाती 'विमुक्त' या नावाने घोषित करण्यात आल्या. उदरनिर्वाहासाठी ज्या जमाती सतत भटकंती करीत असतात त्यांना 'भटक्या जमाती' या नावाने ओळखले जाते.

भटक्यांना गुन्हेगार, चोर, भिकारी आणि उपेक्षित म्हणून हिणवले जात असले तरी भटके भारतात कधी काळी राज्यकर्ते प्रस्तुत सरदार, शूरवीर सैनिक होते अस ऐतिहासीक पुरावे आढळतात.उदा. अहिल्यादेवी होळकर, मल्हारराव होळकर, उमाजी नाईक इ. नामोल्लेख करता येईल.

सामाजीक व्यवस्थेची सुरवात करणारा समाज आज विविध कारणांनी आपला विकास करू शकला नाही आणि अनेक समस्यांनी ग्रस्त असलेला पाहावयास मिळतो. जगातील बहुतेक देशात भटके-विमुक्त समुदाय अस्तित्वासाठी संघर्ष करीत असताना पाहावयास मिळतात. भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक आणि आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास करताना त्यांच्या समस्या जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.